# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, कृषि महाविद्यालय, दापोली, उद्यानविद्या विभागामार्फत एकात्मिक फलोद्यान विकास अभियान या योजनेअंतर्गत मसाला पिके उत्पादन तंत्रज्ञान व प्रक्रिया या विषयावर जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन

---

डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठाच्या कृषि महाविद्यालय, दापोली अंतर्गत उद्यानविद्या विभागातर्फे एकात्मिक फलोद्यान विकास अभियान या योजनेमार्फत "**मसाला पिके उत्पादन तंत्रज्ञान व प्रक्रिया**" या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा दिनांक २७ व २८ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत स्वामिनाथन सभागृह, प्रशासकीय कार्यालय, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथे सकाळी ठिक ०९.०० वाजता आयोजित केली आहे. सदर कार्यशाळेस रत्नागिरी जिल्हयातील सर्व शेतकऱ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आवाहन विद्यापीठामार्फत करण्यात येत आहे.

या दोन दिवसीय कार्यशाळेत विद्यापीठाचे संशोधन संचालक, डॉ. पी. एम हळदणकर, विस्तार शिक्षण संचालक, डॉ. एस. जी. भावे, सहयोगी अधिष्ठाता, डॉ. यु. व्ही. महाडकर, उद्यानविद्या प्रमुख, डॉ. बी. आर. साळवी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, श्री. जगताप तसेच मसाला पिकांवर अनेक वर्ष काम केलेले डॉ. डी. डी. नागवेकर, डॉ. आर. जी. खांडेकर व इतर शास्त्रज्ञ तांत्रिक मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेला उपस्थित राहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी राहण्यासाठी व जेवण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. ज्या शेतकऱ्यांच्या नारळ, सुपारी व आंबा बागा आहेत. तसेच जे शेतकरी मसाला पिके उत्पादनात सहभागी असून नविन लागवडीसाठी इच्छुक आहेत त्यांनी या कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आवाहन विद्यापीठामार्फत करण्यात येत आहे.